माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२३/M/००१३४५**

**अपिलार्थी श्री. आगतराव सिताराम आवटे**
**विरुद्ध**
**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
मालवणी विभाग, चारकोप पोलीस ठाणे, २ रा मजला,
सेक्टर नं. २, कांदिवली (प), मुंबई-४०० ०६७

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ- ११)**
बोरीवली पोलीस ठाणे इमारत, दुसरा मजला, एस.व्ही. रोड,
बोरीवली (पश्चिम), मुंबई-४०० ०९२

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १८.१०.२०२४**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०६.०१.२०२३ | २०.०२.२०२३ | २४.०२.२०२३ | १३.०४.२०२३ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १७.०५.२०२३ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २०.०२.२०२३ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. १३.०४.२०२३ संलग्न केले आहेत.

अर्जदाराने दिनांक ०६.०१.२०२३ रोजी त्यांच्या दि. १०.११.२०२१ रोजी देण्यात आलेल्या समजपत्रात नमूद लोकांचे जबाब माहिती अर्जानुसार मागितलेले होते.

जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.०२.२०२३ चे पत्रान्वये अर्जदारास कळविले की, त्यांनी मागणी केलेली माहिती पोलीस ठाण्याच्या अभिलेखावरुन निर्लेखित करण्यात आली असून दि. ०२.०२.२०२१ ची ठाणे दैनंदिनीची प्रत सोबत जोडून पाठविली.

दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी यांनी आदेशात नमूद केले की, अपिलार्थी यांनी केलेल्या युक्तिवादाप्रमाणे ज्या तारखेला पोलीस ठाणेचा अभिलेख निर्लेखित करण्यात आला आहे, तो दिनांक अपिलार्थी यांनी मागितेलल्या माहितीच्या अगोदरचा आहे. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा अभिलेख तपासून १० दिवसांच्या आत अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे आदेशीत केले.

माहिती मिळाली नाही, असे कारण देऊन अपिलार्थी यांनी द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपिलाच्या सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानुसार पुन्हा अभिलेख तपासला असता त्यांनी मागितलेली माहिती अभिलेखावर उपलब्ध नाही. त्यामुळे उपलब्ध ठाणे दैनंदिनीच्या नोंद असलेली प्रत संलग्न करुन अपिलार्थी यांना कळविले आहे.

अपिलार्थी यांनी आयोगास निवेदन केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेशात १० दिवसांचे आत माहिती देण्याचे आदेश केले होते. परंतू त्यांना आतापर्यंत माहिती मिळाली नाही. तपास सुरु असताना अभिलेख कसे काय निर्लेखित करण्यात आले, हे त्यांना समजून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानुसार अभिलेख तपासून वस्तूस्थितीदर्शक उत्तर अपिलार्थी यांना हे आदेश प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावेत.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांचे आत त्यांनी प्रथम अपिलिय अधिकारी यांचे आदेशानंतर १० दिवसांचे आत माहिती का दिली नाही, याचा खुलासा आयोगास सादर करावा.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१. विद्यमान जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनाप्रमाणे कार्यवाही करावी.**

**२. अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

Gthm chim
18-10-2024

**मुंबई**
**दिनांक : १८.१०.२०२४**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

## अपील क्र. MHSICMU/२०२३/M/००१३४५

**अपिलार्थी श्री. आगतराव सिताराम आवटे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
मालवणी विभाग, चारकोप पोलीस ठाणे, २ रा मजला,
सेक्टर नं. २, कांदिवली (प),मुंबई-४०० ०६७

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ- ११)**
बोरीवली पोलीस ठाणे इमारत, दुसरा मजला, एस.व्ही. रोड,
बोरीवली (पश्चिम),मुंबई-४०० ०९२

**(In continuation of order dtd १८.१०.२०२४)**

उक्त प्रकरणी आयोगाने दि. १८.१०.२०२४ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिले होते:-

*"तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांचे आत त्यांनी प्रथम अपिलिय अधिकारी यांचे आदेशानंतर १० दिवसांचे आत माहिती का दिली नाही, याचा खुलासा आयोगास सादर करावा."*

२. सदर प्रकरणी आयोगाचे आदेश दि. १८.१०.२०२४ रोजीच्या अनुषंगाने श्रीम. निता पाडवी, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, मालवणी विभाग, मुंबई यांनी दि. २८.१२.२०२४ रोजी (आयोग कार्यालयास प्राप्त दि. ०२.०१.२०२५) खालीलप्रमाणे खुलासा आयोगास सादर केलेला आहे:-

*"सदर प्रकरणाच्या अनुषंगाने केलेल्या सविस्तर चौकशीमध्ये असे दिसून आले आहे की, अपिलार्थी श्री. आगतराव सिताराम आवटे यांनी दि. २२.११.२०२० रोजी चारकोप पोलीस ठाणेत केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने नमूद तक्रार अर्जाचे चौकशी अधिकारी पो.उ.नि. सचिन कदम यांनी चौकशी करून आ.क्र. ९०२५/२०२१, दि. १०.११.२०२१ अन्वये अर्जदार यांना त्यांचा तक्रार अर्ज निकाली काढल्याबाबत लेखी पत्राद्वारे कळविलेले होते. त्यानंतर अपिलार्थी श्री. आगतराव सिताराम आवटे यांनी दि.०६.०१.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये त्यांनी दि. २२.११.२०२० रोजी चारकोप पोलीस ठाणेत केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने माहिती मागितली होती. दि. १७.०२.२०२३ रोजी तत्कालीन सहाय्यक माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक (प्रशासन) श्री. अभिजीत अभंग यांनी अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती ही पोलीस ठाणेच्या अभिलेखावरून निर्लेखित करण्यात आल्याबाबतच्या ठाणे. दै.क्र. २८/२०२१, दि. ०२.०२.२०२१ प्रतीसह अर्जदार यांना माहिती दिली होती.*

*अर्जदार यांना पुरविलेल्या माहितीमधील वर नमूद ठाणे दैनंदिनीची प्रतीची पडताळणी केली असता सदर ठाणे दैनंदिनीमध्ये सन २०१८ पर्यंतचे तक्रार अर्ज पोलीस ठाणेच्या अभिलेखावरून निर्लेखित करण्यात आल्याबाबत नमूद आहे. अर्जदार यांनी दि. २२.११.२०२० रोजीच्या तक्रार अर्जाची माहिती मागितलेली होती. त्यामुळे तत्कालीन सहाय्यक माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक (प्रशासन) श्री. अभिजीत अभंग यांनी अर्जदार त्यांनी चुकीची माहिती दिल्याचे दिसून येत आहे.*

..२/-

*अपिलार्थी श्री. आगतराव सिताराम आवटे यांनी मागणी केलेली माहिती सध्या चारकोप पोलीस ठाणेच्या अभिलेखावर उपलब्ध नाही. चारकोप पोलीस ठाणेकडून सन २०२१ पर्यंतचा तक्रार अर्जाचा अभिलेख निर्लेखित करण्यात आला असून त्याबाबतच्या ठाणे. दै.क्र. २१/२०२३, दि. ०६.१२.२०२३ ची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. तत्कालीन सहाय्यक माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक (प्रशासन) अभिजीत अभंग तसेच पोलीस निरीक्षक जगदीश भोपळे यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती पोलीस ठाणेच्या अभिलेखावरून निर्लेखित केलेली नसताना व ती पोलीस ठाणे अभिलेखावर उपलब्ध असताना अपिलार्थी यांना चुकीची माहिती पुरविल्याचे चौकशीमध्ये निष्पन्न झालेले आहे.*

*एकंदरीत केलेल्या चौकशीमध्ये सदर प्रकरणी पोलीस निरीक्षक अभिजीत अभंग तसेच पोलीस निरीक्षक जगदीश भोपळे यांची कसूरी दिसून येत असून त्याचेवर योग्य ती प्रशासकिय कारवाई होण्यासाठी मा. वरिष्ठांना त्यांचा कसूरी अहवाल सादर करण्यात येत आहे."*

३. श्रीम. निता पाडवी, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, मालवणी विभाग, मुंबई यांनी सादर केलेल्या खुलाशाचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. सबब आदेश पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**जन माहिती अधिकारी यांचा खुलासा मान्य करुन करण्यात येत आहे. सदर अपील अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

8-4-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०८.०४.२०२६**